अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# सुधारणेच्या मार्गांतील खांचखळगे–४.

लेखिका, **शकुंतला परांजपे.**

धर्म किंवा परोपकार करायचा तो समाजाचें हित होईल अशा रीतीनेच केला पाहिजे. अविचाराने दानधर्म केला तर त्यापासून नुकसान होण्याचाच संभव अधिक. आतां गुन्ह्याला, आळसाला आणि फुकटेपणालाहि कांहीं परोपकारी संस्था कशा कारणीभूत होतात तें पाहूं. अनेक शहरांतून हल्ली गरीब बायकांच्या बाळंतपणाची फुकट सोय केली जाते, शिशुसंगोपनाचीहि तशीच व्यवस्था केली जाते, दिवसेंदिवस अधिक बायका व मुलें या सोयीचा फायदा घेतात असें तेथील चालक मंडळी मोठ्या अभिमानाने सांगतात, आणि सरकार व जनता यांजवळ अधिक आर्थिक मदतीची याचना करतात. आतां बाळंतपणाची फुकट सोय झाली, शिशुसंगोपनकार्यालयांतून मुलांच्या दूधपाण्याची, आणि शाळांतून शिक्षणाची मोफत व्यवस्था झाली, तर आळशी, भिकारी, गुन्हेगार लोकांचें फावेल हें उघड नाही का ? शिवाय हीं मुलें मोठीं झालीं की आईबापांप्रमाणे भीक मागायला किंवा चोऱ्या करायला तयारच होतील ! प्रसूतिगृहें आणि शिशुसंगोपनकार्यालयें चालवण्यास पैसा मात्र श्रमजीवी माणसांचा खर्च होतो. खेड्यापाड्यांतूनहि गरीब लोकांच्या मुलांना पोटभर खायला मिळावें, त्यांच्या औषधपाण्याची, शिक्षणाची वगैरे सोय व्हावी, याकरतां ग्रामसुधारक परिश्रम करीत आहेत. त्यायोगें आधीच फाजील वाढ झालेल्या गरीब शेतकऱ्यांच्या प्रजेंत भर पडत आहे आणि शेतकरी वर्गाचें दारिद्र्य वाढत आहे.

कारण बालपणीं दूध, लहानपणीं शिक्षण आणि आजारीपणांत औषध, अि
दींची फुकट व्यवस्था जरी या संस्थांनी केली, तरी मोठेपणीं आपले पोट प्र
काला स्वतःच भरावें लागतें. त्यामुळे घरच्या जमिनीला अधिक वांटेकरी उ
होतात आणि त्या वर्गाची अेकंदर अवनतिच होते. ग्रामस्थ लोकांना या प
कारी संस्थांचा लाभ होण्यापूर्वी निसर्ग आपल्या निर्घृण उपायांनी त्य
फाजील संततीचा बळी घेत असे. पुरेशा अन्नाच्या अभावीं आणि योग्य त्या औष
पचारांच्या अभावीं गरीब लोकांची फाजील प्रजा पटापट मृत्युमुखीं पडत
या वस्तुस्थितीची आपल्याला कींव येते, लाज वाटते, आणि आपण त्या
बिचाऱ्या अर्भकांच्या मदतीला धांवून जातों, मोठीं होओीपर्यंत त्यांचें सं
करतों, आणि नंतर दारिद्र्याने व बेकारीने बजबजलेल्या या जगांत त
आपल्या पायांवर उभीं राहण्यास सांगतों. तें त्यांना कसें शक्य आहे ? त्य
बालपणींच त्यांची वाट लागली असती तर बरें झालें असतें असें म्हणण
वेळ येते.

या विपरीत निष्पत्तीचें कारण पाहूं गेल्यास आपणास असें दिसून ये
की वर वर्णन केलेल्या परोपकारी सुधारणा अेकांगी आहेत, समतोल ना
अेखाद्या प्राण्याचें डोकेंच फक्त वाढूं देऊन अितर अवयव पूर्व स्थितींतच
दिले, तर ज्याप्रमाणे तो डोअीजड होऊन कोलमडेल, त्याप्रमाणेंच जनन
कमी करण्याचा विचार करण्यापूर्वींच मृत्युसंख्या कमी करण्याच्या भरीस
त्याने समाजाची स्थिति होते. गरीब शेतकऱ्यांची निरपराधीं मुलें पटापट
मुखीं पडूं नयेत असें वाटत असेल, तर पोसतां येणार नाहीं अशी प्रजा निर
होऊं न देण्याचा मार्ग त्यांना दाखवला पाहिजे. शिवाय जननसंख्येचें
कमी करण्याचा प्रयत्न करतांना अनिष्ट प्रजेची उत्पत्ति कमी किंवा बंद कर
उपाय योजले पाहिजेत, तरच समाजाची उन्नति होअील. प्रसूतिगृहांचा
फायदा घेणाऱ्या बायका निरोगी आहेत किंवा नाहीत, त्यांना मुलें
समाजाच्या दृष्टीने हितावह आहे किंवा नाही, त्या अथवा त्यांचे नवरे

णिक कष्ट करून उपजीविका करतात किंवा नाही, त्यांना वाजवीपेक्षा कमी मुलें आहेत किंवा नाहीत, या सर्व बाबी विचारांत घेऊन कार्य केलें पाहिजे. अेकदां अेका बाईचें बाळंतपण फुकट केल्यावर, अधिक मुलें पोसण्याचें तिला सामर्थ्य नसेल तर तिला संततिनियमनाची माहिती करून दिली पाहिजे, आणि या माहितीचा तिने जर उपयोग केला नाही तर तिला फिरून मदत करतां नये. अेखादी बाअी दुष्ट रोगाने पछाडलेली असेल तर तिला प्रजोत्पादनाला अक्षम केलें पाहिजे. अेखादी जर भीक मागून पोट भरीत असेल तर तिला काम करायला लावलें पाहिजे. संकटांत सांपडलेल्या स्त्रियांना सोडविण्याकरतां व त्यांच्या अर्भकांना पोसण्याकरितां अनेक अनाथाश्रम स्थापन झाले आहेत. तेथे जाणाऱ्या बहुतेक स्त्रिया गर्भपाताचे सर्व उपाय निष्फळ झाल्यानंतरच आश्रमाच्या आसऱ्याला जातात आणि आश्रमांत जन्माला येणाऱ्या अर्भकांपैकीं शेंकडा ९० रोगट आणि जगण्यास नालायक अशीं असतात व त्यांपैकी बहुतेक लवकरच मरतात. परंतु या शेंकडा ९० रोगट अर्भकांना जगवण्याचे शक्य तेवढे प्रयत्न करण्यात येतात. त्यापायीं केव्हां केव्हां अेकेका मुलावर टोंची, किरण अित्यादि उपाय करण्यांत अेका दिवसांत शेंदोनशें रुपयेही खर्च होतात, आणि कित्येक वेळां काबाडकष्ट करणाऱ्या सुदृढ गरीब लोकांच्या हंसऱ्या मुलांना पोटभर भाकरहि मिळत नाहीं. ही विषम परिस्थिति मनाला किंवा बुद्धीलाही पटत नाहीं. समाजांत आज अनेक अन्याय होत आहेत, परंतु प्रत्यक्ष आअीबापांनाही नको असलेल्या अशक्त मुलांना जन्म घ्यायला लावून कृत्रिम उपायांनी त्यांना शक्य तितकीं जगायला लावण्याचा बोजा समाजावर टाकणें रास्त आहे असें मला वाटत नाहीं. याला उपाय म्हणजे प्रथम वयांत आलेल्या सर्व स्त्रियांना संततिनियमनाची माहिती करून देणे, आणि नंतर गर्भपाताची कायद्याने परवानगी देऊन सार्वजनिक अिस्पितळांतून तशी सोय करणें, हे होत. पोटांत असलेलें मूल जर कांही कारणाने आअीला नको असेल तर तें काढून टाकण्याचा हक्क समाजाने व कायद्याने तिला दिला पाहिजे, कारण बळजबरीने तिच्यावर मातृपद लादण्यांत किंवा आअीला नको असलेल्या मुलाला बळजबरीने जन्माला घालण्यांत आणि अशा

तऱ्हेने दोघांचाही भार समाजावर टाकण्यांत, आओीचा, मुलाचा आ
समाजाचा तिघांचाही तोटाच आहे. अर्थात् सर्व स्त्रियांना संततिनियमन
माहिती झाल्यावर त्या पूर्वींअितक्या संकटांत सांपडणार नाहीत हें
तरीहि कांही चूक अथवा हयगय झाल्यास नको असलेलें गर्भारपण त्यांच्या
येऊन ठेपण्याचा संभव आहे आणि तसें झाल्यास गर्भपाताची सोय अ
जरूर आहे.

आतां वरील विचारसरणीला नीतीच्या नांवावर तीव्र विरोध हो
हें मी जाणून आहें. गर्भार राहण्याची भीति असली म्हणजे स्त्रिया स
सहजीं पापाचरण करणार नाहीत, असें प्रतिपादन करणारे कांही नीतिमा
सरसकट सर्व प्रौढ स्त्रियांना संततिनियमनाची माहिती देण्याच्या वि
असतात आणि तरीहि जर तिच्याकडून अपराध घडला तर तिला आप
पापाचें फळ भोगायला लावण्याच्या सूडबुद्धीने तिला नको असलेलें मा
ते तिच्यावर लादूं पाहतात. आतां केवळ भीतीमुळेच ज्या नीतीचें रक्षण
असेल, तिला ' नीति ' म्हणायचें तरी कशाला? शिपाओी पकडील
भीतीमुळेच जो चोरी करण्यास धजत नाही, त्याला साव म्हणतां येअील
शिवाय गर्भारपणाचा अितका बागुलबुवा निर्माण केला असूनहि स्त्रिया सं
सांपडावयाच्या त्या सांपडतातच. मग मात्र त्यांना पापाचीं फळें भोग
लावायचीं. त्यायोगें त्यांच्यावर सूड उगवल्याचें समाधान नीतिबाजांना
लाभलें, तरी हीं ' अनैतिक ' बाळबाळंतीण पोसण्याचा बोजा ' नीतिम
समाजावर पडतो त्याची वाट काय? शिवाय असल्या अनैतिक संबंधा
झालेलें मूल समाजाला आत्मसात् करावें लागून आपला नैतिक दर्जा थो
उतरावा लागतो तो वेगळाच.

नीतीच्या ह्या कल्पना तरी काय आहेत व त्या कशा असाव्यात
आतां थोडा विचार करूं. नीतीच्या नांवावर समाज आज कुमारिकांना
विधवांना संभोगाची उघड परवानगी देत नाही, किंबहुना कोणताही विवा
समागम समाजाला उघडपणें मान्य नाही, असें म्हटलें तरी चालेल.

स्वातंत्र्यावर समाजाचा हा एक जुलूम आहे असें माझें स्वच्छ मत आहे. समागमेच्छा ही अितर वासनांप्रमाणेच अेक वासना आहे, अेक भूक आहे, आणि अितरांस जर त्यापासून उपद्रव होत नसेल, रोगांचा फैलाव होत नसेल, किंवा बिनवारशी मुलांचा बोजा समाजावर पडणार नसेल, तर ज्याने त्याने आणि जिने तिने आपापल्या मनाप्रमाणे ही भूक का शमवूं नये हें समजणें कठिण आहे. पूर्वी ज्या वेळीं संततिनियमनाचे खात्रीचे उपाय माहीत नव्हते, आणि गुप्त रोगां·वर प्रतिबंधक व निवारक उपाय माहीत नव्हते, तेव्हा अनाथ मुलांची उत्पत्ति थांबवण्याकरतां व गुप्त रोगांवर आळा म्हणून वरील नीतीचा पुरस्कार करणें अवश्य व अिष्ट वाटलें असेल ( तरी देखील वेश्याव्यवसाय कोणी बंद करूं शकलें नाहीं ). परंतु आजची परिस्थिति फार बदलली आहे, आणि ती लक्षांत घेऊनच समाजाने नीतीचे नियम बदलले पाहिजेत. व्यक्तिस्वातंत्र्यामुळे जेव्हा समाजाचें नुकसान होऊं लागतें तेव्हा त्या स्वातंत्र्याला आळा घातला पाहिजे, हें मलाहि कबूल आहे. कारण समाजाची उन्नति हें समाजाचें पहिलें ध्येय असलें पाहिजे. तस्मात् व्यक्तिस्वातंत्र्यामुळे जर समाजाचें यत्किंचितही नुकसान होत नसेल तर मात्र तें स्वातंत्र्य उपभोगण्याची प्रत्येकाला पूर्ण मुभा असली पाहिजे. सुशिक्षित समाजांत आज तरुणतरुणींना दीर्घकालपर्यंत लग्न करणें शक्य नसतें. तोंपर्यंत त्यांना ब्रह्मचर्य पाळायला लावणें रास्त नाही. त्यापासून कोणाचाही फायदा नाही, किंबहुना तरुणपणची भूक फार वेळपर्यंत दाबून ठेवल्याने प्रकृतीवर अनिष्टच परिणाम होतात. ज्या वेळीं जें पाहिजे तें न मिळाल्यामुळे जीं तरुण माणसें उत्साही, आनंदी आणि सतेज दिसलीं पाहिजेत, तीं चिडखोर, दुर्मुखलेलीं आणि अकालीं वृद्ध झालेलीं दिसतात. परस्परांविषयींच्या नैसर्गिक भावना दाबून टाकाव्या लागल्यामुळे त्यांच्यामध्यें अेक प्रकारचा कृत्रिमपणा येतो. तारुण्याचा भर ओसरल्यावर लग्न झालेलीं कित्येक जोडपीं संसारांत कधीहि सुखी होऊं शकत नाहीत. ‘ कादंबऱ्यांतून आम्हीं समागमसौख्याचीं वर्णनें वाचलीं होतीं, परंतु तें सुख आमच्या प्रत्यक्ष अनुभवाला कधीच आलें नाही, ’ असे केविलवाणे उद्गार कित्येकांच्या—विशेषतः स्त्रियांच्या – तोंडून अैकूं येतात.

याचें कारण काय ? तर शरीरसंबंधाला हीन लेखल्यामुळे त्याविष बुद्ध्या बाळगलेलें संपूर्ण अज्ञान, आणि दीर्घकालपर्यंत ब्रह्मचर्य पाळल्या प्रेमाच्या रुचीलाच पारखें झालेलें शरीर. शिवाय मूल उपजल्यापासून घर किंवा शाळेंतील शिक्षणांत त्याला आपल्या जननेंद्रियांसंबंधी कोणीहि माहिती देत नाही. आपल्या उत्पत्तीसंबंधी लहान मुलांना स्वाभाविक जिज्ञासा वाटते. तिची तृप्ति तर कोणी करीत नाहीच, उलट त्यासंबंधी उड उडवीचीं अथवा साफ खोटीं उत्तरें देऊन वडील माणसें मुलांना वाटेस लावत त्यामुळे साहजिकच जननेंद्रियांसंबंधी मुलांच्या विपरीत कल्पना होतात आ पुढें पुढें स्त्रीपुरुषसंबंधांत कांहीतरी गौण आहे असें त्यांना वाटूं लागतें. खरो आधुनिक शालेय शिक्षणांत शरीररचनेविषयी, जननेंद्रियांविषयी आणि प्र त्पत्तीविषयी मुलांना माहिती दिली पाहिजे, आणि कामशास्त्र, संततिनियमन, रोगांपासून बचाव या संबंधीचीं पुस्तकें कॉलेजांतील मुलांच्या वाचनालयां उघडपणें ठेवलीं पाहिजेत. कारण याच वयांत तरुणतरुणींना या माहितीची आव कता व जिज्ञासा असते. शिक्षणक्रमांत मानवी शरीराच्या क्षुधा, तृषा आ वासना व त्यांचें कार्य समजावून देतांना कामवासना व प्रजोत्पत्ति यांसंबं शास्त्रोक्त माहिती देणें किती सोपें जाईल ! आतां आपण होऊन तरुणतरु उघडपणें अशी माहिती पुरवणें तर बाजूलाच राहिलें, परंतु कोणत्याहि अ मार्गानें त्यांना ती मिळूं नये यासाठीं वडील मंडळी कडेकोट पहारा करीत अ कित्येक वेळां असें मनांत येतें की मत्सरामुळे तर जुनी पिढी नव्या पिढीवर जुलूम करीत नसेल ना ? आपल्या तारुण्यांत जी स्वतंत्रता आपल्याला उपभो आली नाही, ती आपल्या पोरांनाही मिळूं नये म्हणून तर जुने लोक तरुणा नीतीचीं बंधनें घालीत नसतील ना ? ‘ या गोष्टी शिकवायची जरूर नसते, ज त्या वेळीं त्या आपोआप समजतात,’ असें म्हणणारी पुष्कळ मंडळी भेटत परंतु कैक वर्षें विवाहित असलेल्या जोडप्यांनाही परस्परसुख काय असतें माहीत नसतें. यासंबंधी जर कोणीं आंकडे गोळा केले—आणि विलायतेंत का ठिकाणीं असे आंकडे मिळवलेले आहेत—तर आठ आठ मुलें होऊन सुद्धां ह

स्त्रियांना समागमसौख्य काय असतें याची जाणीव झालेली नसते असें आढळून येईल.

तेव्हा स्त्रीपुरुषशरीराची, कामशास्त्राची, माहिती तरुणांस मिळण्याची सोय केली पाहिजे. असें झाल्यास स्वैराचार वाढेल, अविवाहित तरुणतरुणीहि समागमस्वातंत्र्याचा उपभोग घेतील, समाजांत कोणताही निर्बंध राहणार नाही, मनुष्य क्षणाक्षणाला आपलें प्रेमपात्र बदलील, अशी भीति पुराणमतवाद्यांना वाटत असते. कामवासनेचा बाऊ करून ज्या लोकांनी तिला अवास्तव महत्त्व दिलें आहे, त्यांच्या मनांत ही भीति उत्पन्न होणें साहजिकच आहे. या वासनेला फाजील कालपर्यंत दाबून ठेवल्याने ज्यांच्या शरीरांत ही सतत बंड करीत असते, त्यांना हिचें स्वरूप अनिर्बंध असें दिसलें तर नवल नाही. अशा दबलेल्या लोकांना स्वातंत्र्य मिळाल्यास कांही कालपर्यंत त्यांच्या हातून अतिरेक होणें शक्य आहे, परंतु ज्यांनी उचितसमयीं आणि स्वाभाविक रीतीने या वासनेची तृप्ति केली आहे, त्यांना कसलेहि अजीर्ण होण्याची भीति नाही. दुष्काळांतून आलेल्या माणसाला ‘ खा खा ’ सुटते व अजीर्ण होतें. नियमितपणें आहार करणाराला कधी ‘ खा खा ’ ही सुटत नाही व कधी अजीर्णहि होत नाही. स्वातंत्र्य मिळालें तर मनुष्य क्षणाक्षणाला आपलें प्रेमपात्र बदलील ही दुसरी भीतिही अशीच निराधार आहे. कारण स्वभावतः मनुष्याला नाविन्याची फारशी आवड नाही. तसें असतें तर विड्या ओढणारा मनुष्य नेहमी अेकाच छापाच्या विड्या कां ओढता ? दारू पिणारा मनुष्य नेहमी अेकाच जातीची दारू कां पिता ? अेका प्रेमपात्राची अेकदां संवय झाल्यावर सहजासहजी माणूस दुसऱ्याच्या वाटेला जाणार नाही. त्यांतून केवळ जिज्ञासेने तरुण मंडळींनी आपल्या गद्धे-पंचविशींत अेकाहून अधिक संबंध केले तरी त्यांत वावगें तें काय आहे ? उलट लग्न करून जेव्हा जन्माचे संबंध जोडायचे असतात, तेव्हा वेगवेगळ्या माणसांचा अनुभव घेतल्यानेच आपल्या सोयीचें माणूस बरोबर निवडून काढतां येअील, आणि कामशास्त्रदृष्ट्या अगदी विसंगत अशीं जीं जोडपीं अज्ञानाने विवाहबद्ध होतात, त्यांचें प्रमाण पुष्कळ कमी होअील. ( अपूर्ण )

# कलेसाठीं

लेखक:—बालमुकुंद केशव आचार्य, सुंकेरी (कारवार)

कित्येक त्यांना रसिक म्हणत होते, तर कित्येक व्यसनी, निर्लज्ज, शौ वगैरे म्हणत होते.

पण लोकांच्या या बाष्कळ वल्गनांकडे मुळीच लक्ष न देतां आप कामावर रुजू होण्याची न्यायाधीशांची प्रशंसनीय वृत्ति त्यांच्यांत पू बाणलेली होती, अन् ती त्यांच्या प्रत्येक कृतीवरून स्पष्ट दृग्गोचर होई.

अितक्या समतोल वृत्तीचे ते फर्स्ट क्लास सबजज्ज होते खरे, त्यांना गृहसौख्याचा व समाजसौख्याचा संपूर्ण अभाव होता. त्यांच्या घरां प्रत्येक व्यक्तीची रामरावांशी वागणूक यांत्रिक बाहुल्यांप्रमाणेच होती म्हणा

याला अेक तसेंच कारण होतें. त्यांचा रोजचा कार्यक्रम म्हणजे काम बंद होतांच गानदेवता सरलाबाअींच्या घरीं जाऊन बसायचें. जे करतां घरीं जायचें, तें कसेंबसें उरकतांच परत तेथे हजर.

लग्नानंतरच्या या पांचसहा वर्षांत ते आपल्या पत्नीशीं अेकदां तरी होते की काय, तें त्या दोघांना व असल्यास सर्वसाक्षी परमेश्वरालाच माही

त्यांचे वडील, बॅरिस्टर वामनराव, यांना आपल्या मुलाच्या बुद्धिमत्ते वाचकांच्या मनोवृत्ति मोहून टाकणाऱ्या लेखनकौशल्याचा व संगीतशास्त्रां प्रावीण्याचा जितका अभिमान वाटत होता, त्यापेक्षा कितीतरी पटीने त्यां सरलाबाअींच्या घरीं रात्रंदिवसच्या राहणीमुळे लाज वाटत होती. किंब त्यामुळे त्यांनी घरांतून बाहेर पडण्याचेंच बंद केलें होतें.

कोर्टांतील नोकरांना कामाकरतां सबजज्जांना भेटण्यास सरलाबाअीं घरींच जावें लागत असल्यामुळे ते व घरची मंडळी रामरावांच्या विरुद्ध हो

रामराव सुशिक्षित होते, त्यांना आपल्या वर्तनामुळे वडिलांना व रांना होणाऱ्या मानसिक त्रासाची कल्पना नव्हती असें नाही. पण करतात

त्यांना सरलाबाईंच्या मनोहर कंठाने व गाननैपुण्याने भारून टाकलें होतें. आपण त्यांना सोडून राहिल्यास त्यांच्या गानरसाचा आस्वाद मिळण्याची संधि चुकेल, म्हणूनच ते सरलाबाईंना क्षणभरही सोडून राहण्यास तयार नव्हते. कारण गवयांचें गाणें त्यांच्या लहरीवर अवलंबून असतें हें सर्वश्रुतच आहे. याशिवाय त्यांचा दुसरा कोणताही हेतु नव्हता.

पण गांवांतील लोकांनी व घरच्या मंडळीने मात्र रामरावांवर ' अट्टल वेश्याव्यसनी ' म्हणून शिक्का मारला होता. अन् तें शंभर टक्के सिद्ध करण्यास पुरेसा भक्कम पुरावाही रामरावांच्या दुर्दैवाने त्यांच्या हातीं सांपडला होता.

× × ×

त्या वेळीं रामरावांचा विसावा वाढदिवस नुकताच साजरा झाला होता. व त्या आनंदांत भर घालण्यास ते त्याच वर्षी बी. ए. ला पहिले येऊन ९५ टक्के बक्षिसें मिळविल्याने साऱ्या वृत्तपत्रांनी त्यांची मुक्तकंठाने स्तुति केली होती.

अशा आनंदी वातावरणांत ते अेके दिवशीं चांदण्यांत फिरायला गेल्या-वेळीं प्रतिभादेवीने त्यांच्यावर आपले कृपाकटाक्ष फेंकले, व त्यांना ' अलौकिक दिव्य ' या शीर्षकाची अेक लघुकथा लिहिण्याची स्फूर्ति झाली. त्यांच्या लघु-कथेचा विषय त्यांच्या वयाला साजेसाच होता, म्हणजे त्यांनी नुकतेंच यौवनांत पदार्पण केलें असल्याने, प्रेमाचाच होता. अन् तो असणें साहजिकच आहे. बाल्या-वस्थेतील कोणत्याहि कामांत खेळाडूवृत्तीची छटा दिसल्यावांचून राहील काय ? तसेंच तारुण्यांत शृंगाराची. उदाहरणार्थ जोंपर्यंत माणसाच्या अंगांत रक्ताचा व बुद्धीचा जोर असतो तोंपर्यंत तो सहसा देवाधर्माच्या नादीं लागत नाही. तो आपल्या कर्तबगारीवर विसंबून असतो. पण जेव्हां रक्त सुकतें, बुद्धि मंदावते, तेव्हां मात्र आपल्या दुर्बलतेचें खापर कोणाच्याहि डोक्यावर फोडून मनाचें समाधान करण्याकरतां तो देवाला कवटाळीत असतो. या गोष्टीला रामरावहि अपवाद नव्हते. त्यांना आपल्या गोष्टींत प्रेमाने भारून गेलेल्या अेका तरुणाने आपल्या प्रियेकरतां केलेलें ' अलौकिक दिव्य ' दाखवायचें होतें. तिची सुरवात

# समाजस्वास्थ्य

रमेशने सरलेला लिहिलेल्या पत्राने व्हायची असल्यामुळे रात्रींचें जेवण आटो पतांच त्यांनी तें पत्र लिहिण्यास सुरवात केली.

ता. १८ मे १९३५

मत्प्रिय सरला,

कोणालाहि अेकवचनाअैवजी बहुवचनाने संबोधणें म्हणजे परकेपणाचें द्यो होय अशी माझी प्रामाणिक समजूत आहे, आणि मला तर तुझी आपुलकी आहे. तेव्हा अेकवचनाने संबोधलें म्हणून रागावूं नये. माझा व तुझा प्रथम परिच सुप्रसिद्ध 'हिज मास्टर्स व्हॉअिस' कंपनींचे अेजंट मेसर्स पुराणिक आणि कंप यांच्या दुकानीं रेकॉर्ड खरेदीच्या वेळीं झाला. तो क्षण तूं खास विसरणार नाहीं असें मी समजतों. त्यानंतर वाढत चाललेल्या परिचयाने आतां तर आपण जिव दोस्त बनलों आहोंत. आपल्या प्रत्येक भेटींत माझ्याप्रमाणे तुझ्याहि अंतःकरण अनुराग उत्पन्न झाल्याची साक्ष तुझे डोळे मला देत होते. पण तुझ्याज प्रेमयाचना केल्यास तुला ती न रुचून तुझ्या प्रेमळ सहवासाला मुकावें लाग म्हणून मी अजूनपर्यंत गप्प राहिलों. पण आतां मनाचा तोल संभाळणें अश झाल्यामुळे मी स्पष्ट लिहिण्याचें धाडस करीत आहें.

सरू, तूं माझी झाल्यास मी माझ्या जन्माचें सार्थक झालें असें समजे समाजाच्या दृष्टीने आम्ही जरी अनुरूप नसलों, तरी आमच्या स्वभावधर्मांव आम्ही केवळ अनुरूपच नसून आदर्श अनुरूप आहोंत. माझ्या अंगांतील गुण प्रकाश पडून जगाला त्याचा फायदा मिळण्यास तुझा संबंध पाहिजेच. सुधाकर संपूर्ण कला प्राप्त होण्यास पौर्णिमेचा संबंध पाहिजेच ना? तसाच मल पण तुझा......

आतां रामरावांना झोप येअूं लागल्यामुळे त्यांनी हें अपुरें पत्र 'विध कुमारी' पुस्तकांत घालून ठेवलें व अंथरुणावर अंग टाकलें.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आपलें कामधाम संपल्यावर अनुसूयाबाअी तें पुस्तक उघडलें, तोंच त्यांना तें पत्र दिसलें. तें पाहून त्या बिचकल चडफडल्या, अन् धांवतच जाऊन तें बॅरिस्टर साहेबांना दाखवून म्हणाल

आमचा बाबू बी. अे. बरोबर प्रेमपत्रेंहि लिहायला शिकला आहे. हें पहा त्याने आत्ताङ्क नायकिणोच्या सरलेला लिहिलेलें पत्र. याला आतांच पायबंद घातला पाहिजे, नाहीतर तो पुरा बिघडायचा.

बायकोने दिलेलें पत्र वाचून झाल्यावर वामनरावांनी रामरावांना बोलावून आणून विचारलें, बाबू तूं हें काय चालवलें आहेस ? कांही लाजलज्जा वगैरे नाहीच का ?

—काय केलें मीं, बाबा ?—रामरावांनी हतबुद्ध होऊन विचारलें.

—आणखी उलट मलाच विचारतोस ? या पत्राची हकीकत काय आहे ?—वामनराव संतापून ओरडले.

—हें पत्र खरें नसून मी लिहीत असलेल्या अेका गोष्टींतलि काल्पनिक पत्र आहे.—रामरावांनी शांतपणें उत्तर दिलें.

—काय, पत्र काल्पनिक आहे ? केव्हांपासून झालास तूं लेखक ! किती लेख लिहिले आहेस तूं ? याचा मागला पुढला भाग कोठें आहे, दाखव पाहूं.

— हीच माझी पहिली गोष्ट, आणि या पत्रानेच तिची सुरवात होते आहे.

— म्हणे याच पत्राने सुरवात होते आहे. मला तूं चकवूं पाहतोस ? मी कांहीं बोळयानें दूध पिणारें मूल नाहीं. तुझ्यापेक्षां मला कितीतरी पावसाळे जास्त गेले आहेत, लक्षांत ठेव. म्हणे गोष्टी लिहितों. या सुधारणेच्या नांवाखालीं पाहिजे तसा गोंधळ घालायला मिळतो अलीकडच्या विद्यार्थ्यांना... वगैरे असंबद्ध वाक्यें जेव्हा वामनराव संतापाच्या भरांत बोलूं लागले, तेव्हा अकल्पित आलेल्या या हल्ल्याने रामराव दिङ्मूढ होऊन आपल्या खोलींत जाऊन बसले.

प्राणिमात्रांना सर्व बऱ्यावाअीट गोष्टींचा विसर पाडून त्यांच्याकडून परत संसारचक्र चालवणाऱ्या कालगतीने रामरावांच्या घरांतील मंडळींला हळूहळू या पत्राचा विसर पाडला. सुट्टी संपल्यावर रामराव पुढील शिक्षणाकरतां मुंबअीला निघून गेले, व परत आले ते सबजज्ज होऊनच.

मागील पत्राप्रमाणे आवडूबाऔंच्या सरलाबाऔशीं त्यांचा परिचय हो असा जरी घरच्या मंडळीचा समज होता, तरी तो साफ चुकीचा होता. त्यां तिला नीट पाहिलें सुद्धां नव्हतें. खरोखर त्यांची ओळख झाली ती यांन डिस्ट्रिक्ट जज्जसाहेबांच्या बंगल्यावर. रामराव सबजज्ज होऊन आल्या थोड्याच दिवसांत तेथील कलेक्टरसाहेबांची दुसरीकडे बदली झाल्यामुळे त्यां जज्जसाहेबांच्या बंगल्यावर मेजवानी होती. तेथें बहुतेक वरिष्ठ अधिकाऱ्यां आमंत्रण होतें, यामुळे रामरावांना तेथे जाणें भाग पडलें.

सर्व निमंत्रित मंडळी हजर झाल्यावर कार्यक्रमास सुरवात झाली. त्या प्रामुख्याने निर्देश करण्यासारखा म्हणजे गानदेवता सरलाबाऔंच्या गायना कार्यक्रम होय. त्यांच्या शास्त्रशुद्ध मोहक गाण्याने व गोड आवाजाने रामरा सारख्या संगीतप्रेमी माणसाच्याच नव्हे, तर गद्यभक्त अरसिकांच्या सु चित्तवृत्ति मोहित केल्या होत्या.

समारंभ संपल्यावर रामरावांनी सरलाबाऔशीं बोलून त्यांचा परि करून घेतला. सरलाबाऔ नांवाप्रमाणेच सरलहृदय असल्याने त्यांनी रामरावा आपण कोठे शिक्षण घेतलें, वगैरे सर्व माहिती दिली, व आपली आठवण रात्रि बद्दल विनंति केली. त्या दिवसापासून त्यांचा परिचय वाढत वाढत त्याचा प णाम अखेर रामरावांवर 'अट्टल वेश्याव्यसनी' म्हणून सर्वांकडून शि मारण्यांत झाला.

वामनरावांनी त्यांना या नादांतून सोडवण्याचे अनेक प्रयत्न केले, प व्यर्थ. त्यांचा कांहीच उपयोग झाला नाही. तेव्हा त्यांनी अखेरचा उपा म्हणून त्यांनी आपलें वजन खर्च करून रामरावांची दुसरीकडे बदली क ण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांना त्यांत यश आलें. रामरावांच्या हात बदलीचा हुकूम पडला.

उलट टपालानेच रामरावांनी आपला राजीनामा वरिष्ठांकडे पाठव त्यांत त्यांनी लिहिलें होतें की ' कला हें माझें जीवन आहे. आपल्या हुकम

तें मला मुकणार असल्यामुळे त्या कलेसाठी, माझ्या जीवनासाठी, मी हा राजीनामा सादर केला आहे. त्याचा स्वीकार व्हावा. आपला...'

यापूर्वी कोर्टाच्या वेळेंत तरी रामरावांना सरलाबाईंना सोडून रहावें लागे. पण आतां कोर्टाच्या कचाटींतून सुटल्याने चोवीसहि तास सरलाबाईं-बरोबर राहण्यास त्यांना आयतीच सवड मिळाली. यामुळे वामनरावांना आपला बॅरिस्टरी डाव आपल्याच अंगावर उलटलेला पाहून फार वाईट वाटलें. पण करणार काय ?

याच्या उलट तानसेन, रविवर्मा वगैरे कलावंतांप्रमाणेच आपल्यालाहि सारें आयुष्य कलेसाठी उपयोग करण्यास व कलेचा उपभोग घेण्यास मिळालें म्हणून रामरावांचा आनंद गगनांत मावेनासा झाला होता.

---

# मुलांचे मानसिक दोष

लेखक, डॉ. के. भा. लेले

या सदरांत दोन प्रकारचीं मुलें येतात. पैकी जन्मतःच दोषी असलेल्या मुलांचा विचार येथे करावयाचा नाही. उरलेल्या मुलांत सुद्धां मानसिक विकार कमी अधिक प्रमाणांत सांपडत असल्यामुळे त्यांचें योग्य वर्गीकरण करणें कित्येक वेळां अशक्य होतें. अशा अनेक मुलांमध्यें किरकोळ दोष असल्यावेळीं ते पालकांच्या अथवा डॉक्टरांच्या नजरेसही येत नाहीत. यामुळे अगदीं ठळक उदाहरणें तेवढीं दाखवतां येतात. मानसिक दोषांचें सामान्य स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.

**१. लक्ष लावतां येत नाही.** आपणास आवडणाऱ्या विषयांकडे सर्वांचेंच लक्ष आपोआप वेधलें जातें व त्याकरतां मनाला कष्ट पडत नाहीत. जसें नाटक अथवा सिनेमा पाहणें, गप्पागोष्टींत वेळ घालविणें इ. परंतु मानसिक शक्तीची खरी परीक्षा म्हणजे न आवडणाऱ्या विषयाकडे शक्य तितका अधिक वेळ लक्ष लावणें. उदा. कांहीं मुलांना गणिताचा अथवा अितिहासाचा विषय मुळीच आवडत नाही, यामुळे तीं हे विषय अजिबात सोडून देतात,

आणि अितर विषयांत चांगले गुण मिळालेले असूनहि अेकंदर परीक्षेंत ना
होतात. अशा मुलांना पुढील आयुष्यांत न आवडणारें काम अथवा व्यव
करावा लागला तर तीं सर्वस्वी अपयशी ठरतात.

अशा मुलांना न आवडणारा विषय समजावून सांगण्याचा प्रयत्न केला अ
त्यांचें त्याकडे क्षणभरसुद्धां लक्ष टिकत नाही असें दिसून अेअील. दुसऱ्या
मुलांच लक्ष लागलेंच तर तें अगदी थोड्या वेळांत दुसऱ्याच अेखाद्या विषया
गुंतलेलें दिसेल व आणखी थोड्या वेळांत तिसऱ्या विषयाकडे गेलेलें आढळून येअी
अशा मुलांना न आवडणारा विषय शिकवायचा झाला तर तो थोडा
शिकवावा व नंतर दुसऱ्या विषयाला सुरवात करून थोड्या वेळाने पुन्हा पहि
विषयावर यावें. तें जमलें नाही तर मात्र आपणास त्या मुलाचा कल पा
तिसराच विषय घ्यावा लागेल.

**२. झोंपाळू मुलें.** या वर्गांत येणारीं कांही मुलें अशीं सांपडतील
तीं शांतपणें आपणाकडे लक्ष देत आहेत असेंच सुरवातीला वाटेल, परंतु म
प्रश्न विचारून पाहतां तीं झोपून जागीं झाल्याप्रमाणें करतील व त्या मुल
उत्तर तर देतां येणार नाहीच, परंतु प्रश्न सुद्धां समजला नाही असें दि
येअील. अशीं मुलें सामान्यतः शांत वृत्तीचीं व सुस्वभावी दृष्टींस पडतात. प
खोड्याळ मुलांच्या आहारीं जाऊन तीं अत्याचाराला सुद्धां प्रवृत्त होतात.

**३. स्मरणशक्तीचा अभाव.** वरील दोषाचा परिणाम स्मृतीवर हो
तो असा. ज्या मुलाला सांगितलेलें समजलेंच नाही, तें तो विसरणार तरी कस
कारण कोणतीहि गोष्ट विसरण्याच्या अगोदर ती लक्षांत आली पाहिजे. सां
तलेलें लक्षांत येण्याला नंतर थोडा तरी वेळ लागतो, परंतु तेवढ्या अवधींत त
मुलाचें लक्ष दुसरीकडे कोठें गेल्यास तो विषय त्याला मुळांतच समजत नाह
यामुळे मागाहून विस्मृतीचा प्रश्नच उद्भवत नाही. उदा० 'अरे, आतां अ
क्यांत तुला हा विषय समजावून सांगितला ना ? मग विसरलास कसा ? अितक
जलद विसरूं लागल्यावर आणखी सहा महिन्यांनी परीक्षेच्या वेळीं क
लिहिशील ? आणि पुढे याच विषयावर धंदा तरी कसा करशील ?' व

ाक्यांचा अर्थ मुलाला समजत नाही, यामुळे शून्य मुद्रेने तो आपणाकडे हात राहील.

मनाने निरोगी असलेल्या सात वर्षांच्या मुलाची परीक्षा म्हणजे त्याला कामागून अेक तीन गोष्टी करावयास सांगितल्या असतां त्या त्याला सांगितल्या अनुक्रमाने बिनचूक करतां आल्या पाहिजेत. कांही मुलें पुस्तकांची ानेंच्या पानें तोंडपाठ म्हणून दाखवतात, परंतु वरीलप्रमाणें त्यांची परीक्षा ाहतां दोषी सांपडतात.

**४. स्मृति व व्यवहार.** कांही मुलांना सबंध पुस्तक पाठ म्हणून ाखवतां येअील, परंतु त्याचा व्यवहारांत उपयोग करून घेतां येणार नाही. दा० कायद्याची कलमें तोंडपाठ म्हणणाऱ्या मुलाला आपल्याकडे आलेल्या पक्षाराला कोणतें कलम लागू पडतें हें समजलें नाही तर तो निरुपयोगी वकील ेल. तसेंच पुस्तकी परीक्षेंत पहिला नंबर आलेल्या डाक्तराला अेखादा रोगी ाखवला असतां त्याला काय होत आहे हें सांगतां आलें नाही तर तो पुढें दा कसा करणार ? हीं मुलें सर्वस्वी नालायक समजावींत.

**५. सारासार विचार.** आपणाला कोणतीही गोष्ट करावयाची ाली तर ती भोंवतालची परिस्थिति पाहूनच करावी लागते. परंतु कांही माणांत हा विचार रहात नाही. उदा० राष्ट्रीय स्वयंसेवकांनी सभांमधून पाहुण्यांची अपरिचित माणसांची ओळख करून घ्यावी असें शिक्षण दिलें जातें व तें र्वस्वी योग्यही आहे. परंतु तेथे जमलेलीं मुलें कोणाही मनुष्याला कोणत्याहि ळीं वरील अर्थाचे प्रश्न विचारतांना माझ्या पाहण्यांत आलेलीं आहेत. यामुळे ा विषयाचा अनभिज्ञ मनुष्य (सामान्यतः कोणीहि शिष्ट) त्यांना उद्धट मजतो व यामुळे शिक्षणाला दोष येतो. वास्तविक पाहतां हा दोष मुलांचा थवा शिक्षणाचा नसून तेथील शिक्षकांचा आहे असें मी अनेक वेळच्या स्वानुवाने सांगतों.

**६. तुलनात्मक दृष्टीचा अभाव.** आपणांला भोंवतालच्या सृष्टीचें ान नाक, कान, डोळे, जिव्हा व त्वचा या पांच ज्ञानेंद्रियांमार्फत होत असतें.

यामुळे कोणत्याही वस्तूचा रंग आकार, वजन, वास, कठिणता इत्यादि सांगतां येतात. तथापि व्यवहारांत अेवढ्यानेच भागत नसून अेकाच प्रकार अनेक वस्तु आपणांपुढे मांडल्या असतां त्यांमधील रंगांच्या छटा, आकार किरकोळ फरक, इत्यादि गोष्टी सहज ओळखतां आल्या पाहिजेत. उ नुसता तांबडा रंग घेतला तरी त्यांत फिका तांबडा, गर्द तांबडा, व म अनेक छटा सांपडतात. त्या दोषी मनुष्याला ओळखतां येत नाहीत, य त्याची कुचंबणा व नुकसानी होते. बँकेंत रुपये वाजवून घेतांना खरे व कानाला सारखेच अैकूं येऊं लागले तर धंद्यांत निभाव कसा लागणार? अ आंबलेली बासुंदी रुचकर म्हणून पोटभर खाल्ली, अथवा आंबलेला उस रस ताजा म्हणून पोटभर प्यायल्यानंतर उलट्या जुलाब झाले तर तो कोणाचा? वरील सर्व प्रकारचीं उदाहरणें आपल्या रोजच्या पाहण्यांत येतात

**दोषाचा कडेलोट.** अगदीं खालच्या दर्जाच्या मुलांना वास व हीं माहीतच नसल्यामुळे त्यांना दुर्गंधि समजत नाही व यामुळे कोणताहि घाणेरडा अथवा कडू पदार्थ सुखासुखी खाऊं शकतात. ही खा वृत्ति अनावर झाली म्हणजे चोऱ्या करण्यांत त्यांना अनीति दिसत नाही. या आजकालच्या हिंदुस्थानांतील कालेजी मुलांची वृत्ति ओळखतां येते. बाप जिवावर तीं वाटेल त्या मजा मारतात व त्यांत उणें पडलें म्हणजे चोऱ्या कर हींच मुलें बरोबरीच्या कुलीन मुलींबरोबर बाजारी वर्तन करण्यांत गुप्त अभि बाळगतात व त्यांत त्यांना कोठेही अनीति दिसत नाही. हींच मुलें पुढे दे आधारस्तंभ बनून देशाचा उद्धार करणार! अशा परंतु यापेक्षा किंचित् अ बुद्धिमान मुलांपुढे कांही सारख्या वस्तु ठेवल्या तर त्यांना त्यांमधील साम फरक ओळखतां येत नाही.

**७. परिस्थितीशीं समरसतेचा अभाव.** हें नांव लांबलचक तथापि त्याचा अर्थ स्पष्ट आहे. हीं मुलें बुद्धिवान असतात व त्यांची स्मृति चांगली असते, तथापि त्यांच्यांतील मोठा दुर्गुण म्हणजे परिस्थिति ओळ त्यांना आपली सोय करून घेतां येत नाही. यामुळे त्यांचें चरित्र त्यांना स्व

समाजाला अपयशी ठरतें. उदा० माझ्या पाहण्यांत अेका गणिती प्रोफेसराने र्वस्वावर पाणी सोडून आपल्या स्वतःला कामशास्त्राला वाहून घेतलेलें आहे. वढ्यानेच तो न थांबतां फ्रान्समधें जसा व्यभिचार (अिकडील लोकांच्या ृष्टीने) चालतो तसा हिंदुस्थानांतही आजच्या परिस्थितीला लागू आहे असा ाचा आग्रह आहे. दुसरा अेक प्रोफेसर अिंग्लंडला जावून 'मुलांचें शिक्षण' ा विषय शिकून आला व पुढें त्याने नाटकी व्यवसाय चालवलेला आहे. त्याची ास्याची कल्पना अितकी विचित्र आहे की त्याला केव्हाही व कोठेही गंभीर िषयच दिसत नाही. हा विदूषकी प्रोफेसर बोलावयास उभा राहिला म्हणजे प्रसंगा-धान सोडून कोणताही विषय हंशावर नेतो व तें वरतीं वर्णन केलेल्या अल्लड ालेजी तरुणांना आवडतें, म्हणून तो त्यांच्यामधें प्रियहि आहे. तथापि ाच्या दृष्टीने अशीं माणसें सर्वस्वी घातकी समजून त्यांच्या कृत्यांना आळा ातला नाही तर ते आपली कर्तबगारी तरुणांमधें पेरल्याशिवाय राहणार नाहीत. सरें उदाहरण, अेक बी. अे., बी. टी. विदुषी सिनेमा नटी बनली व डॉ. कुर्त-ोटींनी तिची वाहवाही केली. हें नटी या दृष्टीने ठीक झालें, परंतु हाच तिचा डा तरुण मुली घेऊं लागल्या तर देशाच्या दृष्टीने काय परिणाम होईल ? ाणखी अेक विदुषी माझ्या पाहण्यांत आहे, ती अितकी शहाणी आहे की तिला र्व जग मूर्ख दिसतें व तसें सिद्ध करण्याला ती आपल्याकडून कडक शब्दांत ाहिते. परंतु या तिच्या कृतीने तिची व्यवहारशून्यता स्पष्ट होते. हा डाव ाधण्यांत तिचा अेक अंतस्थ हेतु असेल व तो म्हणजे तिचा परदेशी प्रणयभंग ागावर आला हा स्वैराचार नसून स्वातंत्र्यवृत्ति दाखवण्याला आपली विद्वता हें क तिच्या हातीं जणू शस्त्रच आहे. या व्यवहारहीन विदुषीला व तिच्या मुंबअींतील हकाऱ्याला अितकी साधी गोष्ट सुद्धां समजेना, की त्यांच्या इतकी समाजाला कल यावी असा खराच त्यांचा स्तुत्य हेतु असेल, तर शिष्टाचाराला धरून माजांतील ठळक व्यक्तींचे दोष दाखवून त्यांचें कार्य साधणार आहे. परंतु त्यांची ती म्हणजे रस्त्याने जाणाऱ्या मनुष्यावर झाडावरील कावळ्याने ओरडणें, अथवा स्त्यावरून भटकणाऱ्या कुत्र्यांनी प्रसंगविशेषीं समाजावर भुंकल्याप्रमाणें होतें.

अर्थात् त्यांच्याकडे सामान्य समाज लक्ष न देतां आपला रस्ता सुधारीत अ
यामुळे स्वतःला वाळींत ठेवल्याप्रमाणें त्यांची अवस्था होते. वरील वर्णना
अितर अनेक व्यक्ति अधिक न सांगतांच वाचकांच्या डोळ्यांपुढे उभ्या रा

**माझी दिलगिरी व माफीची याचना.** प्रस्तुतचा विषय वाच
समजावून सांगण्याकरितां वरील ठळक उदाहरणें मला घ्यावीं लागलीं. ही म
व्यवहारहीनता म्हणावी तर विषय तरी कसा मांडावा व उदाहरणांच्या अ
प्रस्तुतचा लेख तरी कसा लिहावा हें वाचक सांगूं शकतील काय? मी
व्यक्तींची माफी मागतों.

**८. आधार.** वरील लेखमाला 'लान्सेट' च्या 'अर्ली मेंटल डि
या पुस्तकावरून लिहिलेली असून उदाहरणार्थ शेवटीं महाराष्ट्रांतील कांही
माणसांच्या चरित्राचा मला उल्लेख करावा लागला. यामुळे जर को
उपमर्द झाला असेल तर देशहिताच्या दृष्टीने त्याबद्दल दुखविलेल्या माण
पुन्हा अेक वेळ माफी मागून ही लेखमाला पुरी करतों.

**उपाय.** देशाच्या व व्यक्तीच्या दृष्टीने वरील वर्णन फारच भडक
त्यावर उपाय सांगितल्याखेरीज हा विषय पूर्ण होणार नाही असें डाक्तरी
तरी सांगतें. हा प्रश्न माझा अेकट्याचा नसून त्यावर अधिकाराने अनेक
( तशी वस्तुस्थिति असेल तर ) उपाय सांगूं शकतील. त्यांच्याकडून म
छापला गेला म्हणजे मीहि आपल्या वतीने लिहूं शकेन.

सरतेशेवटीं अनेक दृष्टया अप्रिय परंतु परिणामीं गुणकारक असा हा
छापल्याबद्दल मी '**समाजस्वास्थ्या**' च्या संपादकांचे आभार मानतों.
[डॉ. महाशयांचीं मतें आम्हास मान्य नाहीत हें वाचक समजतीलच–**संपाद**

---

# वंध्यत्वाचीं कारणें

अमेरिकेंत डॉ. मीकर यांनी या विषयावर अेका वैद्यकीय मासि
लिहिलेल्या लेखांत असें म्हटलें आहे की जेव्हा अेखाद्या जोडप्याला मुलें
नाहीत, तेव्हा त्यांपैकी कोणातरी अेकाचाच दोष असतो असें फारच

घडतें. बहुतेक वेळां असेंच दिसतें की दोघांतही थोडी कमतरता असते आणि या उणिवांचा संयुक्त परिणाम होवून त्यांना मुलें नाहीत. म्हणजे या दोन स्त्री-पुरुषांचा वेगवेगळ्या माणसांशी समागम झाल्यास त्या दोघांनाही मुलें होणें शक्य असतें.

या दृष्टीने डॉ. मीकर स्त्रियांचे व पुरुषांचे तीन वर्ग पाडतात. पुरुषाचें वीर्य तपासून पाहिल्यास त्यांत अेक 'सीसी'मधें सहा कोटी रेतजंतु किंवा यापेक्षा अधिक सांपडले, आणि त्यांपैकी निदान शेंकडा ७० हालचाल करणारे असून वेड्यावांकड्या आकाराचे जंतु शेंकडा २० पेक्षा अधिक सांपडले नाहीत, तर तो पुरुष प्रजोत्पादनाच्या दृष्टीने ते उत्तम समजतात; रेतजंतूंची संख्या २ ते ६ कोटि, पैकी हालचाल करणारे शेंकडा २० ते ७०, आणि वेडेवांकडे जंतु शेंकडा २० ते ३० असल्यास त्याला ते मध्यम मानतात; आणि जंतूंची संख्या यापेक्षा कमी, त्यांत हालचाल करणारांचें प्रमाण कमी, आणि वेडेवांकडे जंतु जास्त असल्यास तो कनिष्ठ मानतात. त्याचप्रमाणे त्यांनी स्त्रियांचेही तीन वर्ग पाडले आहेत, परंतु त्यांचा तपशील त्यांनी या निबंधांत लिहिलेला नाही. ज्यांपासून गर्भधारणा झाली नाही असे शंभर समागम घेतले, तेव्हां त्यांपैकी १४ पुरुष उत्तम होते, ५९ मध्यम होते, आणि २७ कनिष्ठ होते, आणि स्त्रियांचे बाबतींत ८ उत्तम, ५८ मध्यम, आणि ३४ कनिष्ठ होत्या. दोघांचाही विचार करतां त्यांना असें आढळलें की शंभरांपैकी ८ प्रसंगीं दोष फक्त पुरुषाचा होता, १४ प्रसंगीं फक्त स्त्रीचा होता, आणि बाकीच्या ७८ प्रसंगीं थोड्याबहुत प्रमाणांत दोघांचाही होता.

वीर्य जननक्षम नसण्याचीं कारणें त्यांनी पुढीलप्रमाणें विभागलीं आहेत. १. कांही कारणांनी बीजकोशांत रेतजंतु व्हावे तसे उत्पन्न होत नाहीत. २. किंवा पुरुषाच्या व स्त्रीच्या जननमार्गांतून ते सुरक्षितपणें जाऊं शकत नाहीत. यांपैकीं पहिल्या जातीचीं कारणें कायमचीं किंवा तात्पुरतीही असूं शकतील. अशीं कारणें स्त्रियांचे बाबतींत अधिक लवकर कळतात. पुरुषाच्या बीज-कोशाच्या आकारावरून कांहीच ठरवतां येत नाही, कारण अतिशय लहान

दिसणाऱ्या बीजकोशांत देखील कधीकधी भरपूर रेतजंतु उत्पन्न होत असता जर ते पुरेसे उत्पन्न होत नसतील, तर त्यावर उपाय वाढ पुरी होण्यापूर्वी करावा लागतो; वीस वर्षांपुढे अशा उपायांचा उपयोग होत नाही, कारण वाढ खुंटलेली असते. कारणें तात्पुरतीं असल्यास मात्र उपाय चालेल. रोगांमुळे किंवा अशक्ततेमुळे प्रकृति खालावलेली असेल तर अशा वेळीं रेतोत्पत्ति चांगली होत नाही.

व्हिटॅमीन 'ई' हें जननाला आवश्यक आहे यावर भर देतां ये… कारण सामान्यतः हें व्हिटॅमीन अन्नांत असतेंच, आणि तें वेगळें देण्यापासू… फायदा होतो असें दिसत नाही. त्याचप्रमाणे लठ्ठपणामुळे मुलें होत नाही… हीहि कल्पना चुकीची आहे. लठ्ठपणा आणि वंध्यत्व या दोन्ही गोष्टी अे… सांपडतात हें निर्विवाद आहे, परंतु त्या दोन्ही पचनदोषामुळे उत्पन्न होत… अितकेंच. लठ्ठपणामुळे मुलें होत नाहीत असें मानण्याचें कारण नाही.

थायरॉइड ग्लँड, पिट्विटरी ग्लँड, आणि बीजकोश यांचें या द… अतिशय महत्त्व आहे, आणि ज्या वेळीं अितर कोणतेंहि कारण न दिस… रेतजंतूंची संख्या किंवा त्यांची हालचाल पुरेशी नसेल किंवा वेड्यावांक… जंतूंचें प्रमाण फाजील असेल, तेव्हा बीजकोशांच्या कार्यांत कमतरता आहे अ… समजलें पाहिजे आणि अशा वेळीं बीजकोशांचा अंतःस्राव दिल्याने उप… होतो असा अनुभव आहे.

रेतजंतु पुरेसे आणि योग्य स्थितींत असले पाहिजेत अितकेंच नव्हे … ते स्त्रीच्या योनिमार्गांत योग्य ठिकाणीं पोंचले पाहिजेत. गर्भधारणेच्या द… हे जंतु गर्भाशयाच्या तोंडाच्या शक्य तितक्या जवळ पडले पाहिजेत. हें होतें … नाही हें पाहण्याकरतां समागमानंतर दोन तासांनी गर्भाशयाच्या तोंडा… वळचा कांही द्रव घेऊन तो सूक्ष्मदर्शक यंत्राने तपासल्यास त्या यंत्रांत अे… वेळीं जेवढा भाग दिसेल, त्यांत दोन ते वीस जिवंत हालचाल करणारे … दिसले पाहिजेत. तसे ते न दिसल्यास त्याचा अर्थ असा की अेकतर रेतांत …

असला पाहिजे, किंवा योनिमार्गातील परिस्थितीमुळे रेतजंतूंचा नाश होत असला पाहिजे. तसेंच स्त्रियांनी स्वच्छतेची काळजी न घेतल्यास, किंवा स्त्रीचें समागमापूर्वी पुरेसें उद्दीपन न झाल्यास, गर्भाशयाचें तोंड नेहमी ज्या श्लेष्ममय बुचानें बंद राहतें, तें तेथून हालणार नाही, आणि गर्भाशयाचा मार्ग मोकळा होणार नाही. त्याचप्रमाणे स्त्रीचें वारंवार उद्दीपन मात्र होऊन कामपूर्ति न झाल्यास त्याचाही परिणाम स्त्रीच्या श्रोणिभागांत रक्तसंचय कायमचा जास्त होऊन तो गर्भधारणेला प्रतिकूल होईल.

---

# संततिनियमनार्थ गर्भाशयांत बसवलेलें वळें.

असें वळें बसविण्यांत धोका असतो, आणि त्याचा उपयोगहि होत नाही असें आम्ही अनेक वेळां लिहिलें आहे. अेका अमेरिकन वैद्यकीय मासिकांत प्रसिद्ध झालेल्या पुढील हकीकतीवरून आमचे मताला पुष्टि मिळते. ‘ अेका ३५ वर्षांच्या स्त्रीचें १९२९ सालीं लग्न झालें व पुढील वर्षी तिला अेक मूल झालें. नंतर १९३१ सालीं या वळयाचे मूळ कल्पक बर्लिन येथील डॉ. ग्रेफेनबर्ग यांनी स्वतः तिच्या विनंतीवरून तिच्या गर्भाशयांत अेक चांदीचें वळें बसवलें. कांही दिवसांनी तें बदलून सोन्याचें वळें बसवलें आणि तें दरवर्षी बदलायचें असा क्रम चालला होता. मार्च १९३५ मध्यें नवीन वळें बसवलें, आणि ९ सप्टेंबर १९३८ पर्यंत तेंच वळें आंत असून तिचा मासिक स्राव नियमितपणें चालू होता. तो पुढें ४ नवंबरपर्यंत न झाल्यामुळे तिनें डाक्तराकडून तपासून घेतलें, तेव्हा ती दोन महिन्यांची गरोदर आहे असें आढळलें. तें वळें हाताला लागत होतें आणि क्ष किरणांनीही तें दिसलें. तिला अिस्पितळांत ठेवून ते वळें शस्त्रक्रियेने काढलें. नंतर तिला कोणताहि त्रास न होतां ५ जून १९३९ रोजीं ती बाळंत झाली, व मूल सशक्त व निरोगी दिसलें. या वळ्याने जरी या बाअीचें नुकसान झालें नाही, तरी त्याचा उपयोग मात्र झाला नाही हें उघड आहे, आणि तें तज्ज्ञाने बसवलेलें होतें हेंही लक्षांत घेतलें पाहिजे.

---

# ग्रंथपरीक्षण

**स्वीकार.** लेखक, शरच्चंद्र केशव टोंगो. प्रकाशक, ब. गो. गर्गे, प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. पृ. १४८.

' या कादंबरीची रचना विस्कलित आहे, तिच्या कथानकांत वेग असला तरी विकास नाहीं आणि तिची भाषाही सदोष आहे,' असा शेरा श्री. माड करांनी प्रस्तावनेंत मारला आहे. माझें दुमत नाही. लेखकाची ही पहि कादंबरी आहे आणि त्या मानानें वाईट नाही. परंतु प्रसंगांच्या शक्याश तेव्हा पूर्ण विचार करून नंतरच त्यांना कादंबरींत स्थान द्यावें. त्याप्रमा पात्रांनाही. ' आशा ' या पात्राची कल्पना मुळांत चांगली आहे, परंतु शाळे तिच्या राहत्या ठिकाणींच तिचें जें बेताल वर्तन वर्णिलें आहे, तें शक्य हो वाटत नाही. अशा परिस्थितींत तिला शाळेंतून केव्हाच काढून टाकलें अस

**शकुंतला परां**

---

# पत्रव्यवहार

१

आपल्या मासिकाच्या जुलैच्या अंकांतील 'प्रकाशांतील व्यक्ति' या ग्रंथा परीक्षणांत श्री. शकुंतलाबाई परांजपे यांनी त्या ग्रंथांत डॉ. र. पु. परां यांवर केलेल्या एका आरोपाला उत्तर दिलें असून त्यांत डॉ. आंबेडकरा ' अटी विलक्षण होत्या ' म्हणून त्यांना अर्थशास्त्राचे प्रोफेसर नेमलें नाही, म्हटलें आहे. आपण इतिहास आणि अर्थशास्त्राचे प्रोफेसर झालों तरी इतिह शिकवणार नाही व सरकारी नोकरी पतकरली तरी राजकारणांत पड खेरीज राहणार नाही, या आंबेडकरांच्या दोन ' विलक्षण अटी ' होत्या विधान योग्य चौकशी करूनच शकुंतलाबाईंनी परीक्षणांत केलें असावें. तेव्हा अटी मुख्य होत्या हें धरून चालावयास हरकत नाही. यांपैकी पहिली अट

कोणत्याहि शिक्षणतज्ज्ञाला विलक्षण वाटणार नाही. आंबेडकरांनी अर्थशास्त्राचा विशेष अभ्यास केलेला असून ते त्यांत प्रवीण होते. तेव्हां त्यांच्या त्या विषयाच्या ज्ञानाचा उपयोग करून घ्यावयाचा होता. ' प्रोफेसर ' याचा अर्थ जर ' प्रवीण ' असा मानला, तर अनेक विषयांत प्रवीण होणें फारसें सोपें नाही; परांजप्यांसारख्या शिक्षणाच्या व्यवसायांत आयुष्य घालविलेल्या तज्ज्ञाला हें माहीत होतें. अर्थशास्त्र व अितिहास हे वेगवेगळे व व्यापक विषय आहेत. मुंबईखेरीज अितर विश्वविद्यालयांत प्रत्येकाला स्वतंत्र विषय म्हणून स्थान आहे व मुंबईत जरी परीक्षेच्या दृष्टीने यांची मोटळी बांधलेली असली, तरी ते वेगवेगळ्या अध्यापकांनी शिकवणें शक्य व अिष्ट आहे. सोयीच्या दृष्टीनेही कॉलेजांतून ते विषय वेगवेगळे प्रोफेसर शिकवीत देखील असतील. मग आंबेडकरांची ती अट विलक्षण कां वाटावी ? परांजप्यांसारख्या शिक्षणतज्ज्ञांनी तरी तीं दोन विषयांची गठडी कॉलेजांतून चालू ठेवण्याचा आग्रह कां धरावा ? अेकेका विषयास त्यांत प्रवीण असा अेकेक प्रोफेसर निदान अेल्फिन्स्टन कॉलेजासारख्या प्रसिद्ध विद्यालयांत ठेवण्याची अिष्ट सुधारणा घडवून आणण्याची अेक संधि या ' विलक्षण ' अटीच्या सबबीवर घालवावयास नको होती.

अितर देशांतील स्थिति पाहिली तर दुसरीहि अट वाटते तितकी विलक्षण नाही. या देशांतही बहुतेक विश्वविद्यालयें निमसरकारी असून देखील त्यांतील प्रोफेसर राजकारणांत पडतात व कायदेमंडळांचे सदस्य होतात. सरकारी कॉलेजांतील प्रोफेसरांना मात्र सरकारी नोकरीचे नियम लागू आहेत. अितर सरकारी नोकरांना नसलेली राजकारणांत पडण्याची सवलत प्रोफेसरांना देण्याचा प्रयत्न परांजप्यांनी केला असता, तर त्यांना प्रधानमंडळांतील त्यांच्या सहकाऱ्यांचा पाठिंबा व विशेषतः गव्हर्नरसाहेबांची संमति कदाचित् मिळाली नसती. तरीपण अर्थशास्त्राच्या प्रोफेसराला राजकारणापासून सर्वस्वी आलिप्त राहतां येत नाही, ही अेक गोष्ट लक्षांत घेऊन आंबेडकरांना आपल्या विषयापुरतें मतप्रदर्शनाचें ( लेखनाचें ) स्वातंत्र्य कदाचित् देतां आलें असतें. तेवढ्याने त्यांचें समाधान झालें असतें की नाही हा प्रश्न निराळा ! पण त्यामुळे

निदान शिक्षणमंत्र्याची बाजू या वादांत अधिक खंबीर दिसली असती.

सारांश आंबेडकरांची अेक अट मुळींच विलक्षण नव्हती, व त्या वेळच्या परिस्थितींत जरी विलक्षण वाटली, तरी त्या बाबतींत कांहीं तोड काढतां आली असती असें वाटतें. आपला, अेक वाच

२

मला आपल्याकडून कांही उपदेश हवा आहे. मला माझ्या व तेराव्या वर्षी हस्तमैथुनाची संवय लागली. माझें बालपण अत्यंत नीच लोकांच्या मध्यें गेलें असल्यामुळे मला अशी वाअीट संवय लागली, आणि ती अितकी आचरणांत आणूं लागलों की कल्पनाच करतां येणार नाही ( दिवसांतून एकदां ). ती संवय मी वयाच्या १९ व्या वर्षापर्यंत आच आणली. पुढें मीं अेका तरुण मुलींशी संभोग केला. त्या वेळीं मला फा आनंद झाला नाही. पण त्या वेळेपासून माझे गाल बसूं लागले, डोळे जाऊं लागले. मीं अेकदांच संभोग केला होता. सध्यां माझे गाल अितके आहेत की माझी मलाच लाज वाटूं लागली आहे. डोळेहि अितके खोल आहेत की माझें सौंदर्य नष्ट झालें आहे. लोक मला नांवें ठेवतात. प्रत्ये माझ्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर त्यांच्या तोंडावर निराळाच भाव दिसूं लाग आणि आमच्या शेजारच्या प्रत्येक माणसाला मीं आवडत नाही. आणि मला माझ्या कृत्याबद्दल राग येतो. मला अेकाने अेका वर्षापूर्वी सल्ला दिला की नेहमी स्त्रीशीं संभोग करीत जा म्हणजे तुझा चेहरा पूर्ववत् होअील. मी या वर्षांत स्त्रीसंभोग जवळजवळ १५ वेळां केला. परंतु चेहरा मात्र जा उतरत चालला आणि माझी दिवसेंदिवस निराशा होत चालली आहे. माझें वय २१ वर्षांचें आहे. मला कोणतीहि गोष्ट करायला उत्साह वाटत न माझें शरीर प्रथम जसें उत्सित असे तसें आतां राहिलें नाही. लघवी के पिवळी केव्हां पांढरी येते. हे सर्व दोष निघून जातील आणि माझें श पूर्ववत् होअील असा मला आपण उपदेश कराल अशी आशा करतों. नि माझे गाल बसलेले पूर्वीसारखे होतील व डोळे खोल गेले आहेत ते वर येत

आणि माझें सौंदर्य मला मिळेल, असा उपदेश येत्या अंकांतच कराल अशी मी आपणास विनंति करतों. तसेंच मला पुढें लग्न झाल्यावर संतति होईल की नाही हें कळविण्याची कृपा करावी. आपला **अेक कृपाभिलाषी.**

उ. सामान्यतः हस्तमैथुन हें भयंकर पाप आहे किंवा भयंकर हानिकारक आहे, अशा समजुतीचा मनावर परिणाम होऊन त्यामुळे प्रकृति बिघडते अशीं उदाहरणें नेहमी सांपडतात. ही संवय लागण्यास नीच लोकांच्या संगतीचें कारण नसतें. तज्ज्ञांच्या मताने ही संवय कमीअधिक प्रमाणांत शेंकडा ९९ लोकांना विशिष्ट वयांत लागते, तेव्हा त्यांत उच्च किंवा नीच संगतीचा संबंध नाही, आणि अतिरेक न झाल्यास तिचा परिणामही दिसून येत नाही. परंतु आपली गोष्ट याहीपेक्षा विलक्षण आहे. अेकदां स्त्रीसंभोग केल्याने देखील संसर्गजन्य रोग लागणें शक्य आहे, परंतु आपण सांगतां हें वर्णन संसर्गजन्य रोगाचें दिसत नाही, आणि गाल बसणें व डोळे खोल जाणें हें अेका संभोगाने होणें शक्य नाही. लहान मुलांचे गाल जसे गुबगुबीत असतात तसेच मोठेपणीं राहणें हें चांगल्या प्रकृतीचें लक्षण समजत नाहीत, परंतु आपल्या प्रकृतींत खरोखरच कांही बिघाड झाला असेल, तर अेखाद्या चांगल्या डाक्तराकडून तपासून घ्यावें म्हणजे समजेल. कांही झालें तरी असा बिघाड अेका स्त्री-संभोगाने होणें तर शक्य नाहीच, पण वर्षांतून पंधरा वेळां केल्यानेही शक्य नाही. बिघाड झाला असेल तर त्याचें कारण वेगळें असलें पाहिजे, आणि त्याकरतां डाक्तर कदाचित् कांही करूं शकेल. परंतु केवळ गाल आणि डोळे औषधाने वर आणणें अशक्य आहे, तें अेकंदर प्रकृतीवरच राहणार. प्रत्येकजण आपल्या चेहऱ्याकडे पाहतो व त्यामुळे त्याच्या तोंडावर वेगळा भाव दिसूं लागतो, हा आपला भ्रम आहे. हस्तमैथुनाची अगर स्त्रीसंभोगाची कोणतीही खूण चेहऱ्यावर दिसणें शक्य नसतें (अर्थात् संस्कृत कवींचीं नखक्षतांचीं वगैरे वर्णनें बाद केल्यास). चोराच्या मनांत चांदणें अशी आपली स्थिति झाली आहे, यापलीकडे कांही नाही. लग्न झाल्यावर मूल होईल कीं नाही हें देखील सूक्ष्म-

दर्शक यंत्राने रेत तपासून डाक्तरच आपणांस सांगूं शकेल. ( अर्थात्
दोष नसल्यास ). **सं.**

**३.**

१. अग्निमांद्यावर उपाय काय ? विकार दहा बारा वर्षांचा
२. शरीरावर चामखिळी कां होतात ? व उपाय ? आपला...

**उ. १.** अग्निमांद्य हा वेगळा रोग मानतां येणार नाही व त्यावर
लागू पडेल असा उपायही सांगतां येणार नाही. **२.** अमुक रोग कां होतो
कारण फारच क्वचित् सांगतां येतें. वैद्यकीय ज्ञानाची अजून इतकी
झालेली नाही, चामखिळींवर डॉ. रॉबिनसन यांनी पुढील उपाय सां
आहेत. (१) एक ड्राम सॅलिसिलिक ॲसिद, अर्धा औंस मद्याकांत विरवून
चामखिळीवर दिवसांतून चारदां, किंवा वाटल्यास दर तासाला अेकदां, ला
याने त्वचेला अिजा होत नाही. (२) १ ड्राम बीटानापथॉल, १ ड्राम सॅलिसि
ॲसिद आणि अर्धा औंस व्हॅसलिन असें मलम तयार करून तें दिवसा
तीनदां माफक प्रमाणांत लावावें. रात्रीं निजतांना तेंच लावून वर कापूस
बांधून ठेवावें. **सं.**

---

# शारदेचें पत्र

अितर साहित्यिकांना नांवें ठेवण्याचा उपक्रम मला वाटतें प्रथम
क्यांनी रत्नागिरीला सुरू केला. नंतर सोलापूरला खांडेकरांनी तोच
गिरवला. य. गो. जोशांनी तर तशा धर्तीचें अेक पुस्तकच लिहिलें. वा.
जोशांनी स्वतःची महति सांगतां सांगतां अितरांना 'तिसऱ्या दर्जाचे ले
ठरवले आणि आतां मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक उत्सवाच्या वेळीं माड
करांनाही दुसरें कांही सुचलें नाही. लेखनावर कमावलेला पैसा आपण स्वत

खर्च केला नाही असें सांगून वा. वि. जोशांनी अितरांवर जो अप्रत्यक्ष आरोप केला, तोच आरोप माडखोलकरांनी प्रत्यक्ष केला. वा. वि. जोशी वकील आहेत, माडखोलकरांना भरपूर पगाराची नोकरी आहे, तेव्हां अितर लेखक पैशाकरतां लिहितात हा आरोप करण्यांत त्यांचें मोठेंसें सौजन्य दिसत नाही. 'साहित्यिकांचीं भांडणें धंदेवाअिकांचीं आहेत' या त्यांच्या म्हणण्याला मला मोठासा आधार दिसत नाही. आज अत्र्यांचा आणि फडक्यांचा वाद लोकांना प्रामुख्याने दिसत आहे, पैकी फडक्यांना भरपूर पगारी नोकरी आहे, तेव्हां त्यांचा धंदा लेखकाचा नव्हे आणि अत्रे हल्ली सिनेमाच्या धंद्यांत गुंतलेले आहेत, तेव्हां त्यांचाही धंदा लेखकाचा नव्हे. बोलपटाच्या गोष्टी ते लिहितात, परंतु अितरांच्या गोष्टी घेऊनही त्यांना बोलपट काढतां येतील. तेव्हां हीं भांडणें 'साहित्याचा बाजार भरवून बसलेल्या धंदेवाअिकांची आहेत. अेखाद्या उच्च तत्त्वासाठीं किंवा कार्यासाठी सर्वस्व पणाला लावून झगडणाऱ्या ध्येयवाद्यांचीं नव्हेत' या म्हणण्यांत काय अर्थ आहे? तसें म्हटलें तर माडखोलकरांना तरी काय ध्येय आहे? स्वतःचें शरीर घाऊक विकणारी आणि त्यामुळे पैसा आणि शिवाय सन्मान पावणारी पतिव्रता जशी किरकोळीने शरीरविक्रय करणाऱ्या वेश्येला बाजारबसवी म्हणते, त्याचप्रमाणें नोकरी करणारे माडखोलकर किरकोळीने लेखन विकणाऱ्या लेखकांना बाजारबसवे म्हणतात. परंतु तत्त्वाच्या दृष्टीने या दोहोंत फरक काय? माडखोलकरांनी जोंपर्यंत अेखाद्या तत्त्वाकरतां सर्वस्व पणाला लावलेलें नाही, तोंपर्यंत लोकांनी तीच गोष्ट न केल्याबद्दल त्यांना नांवें ठेवण्याचा अधिकार त्यांचा नाही. सर्वस्व पणाला लावणारे लोक कोणत्याही देशांत आणि कोणत्याहि कालांत अपवादात्मकच असतात. परंतु भांडणें अपवादात्मक नसतात, तीं नेहमी चालूच असतात. तेव्हां भांडणारीं माणसें अपवादात्मक उच्च दर्जाचीं नाहीत या म्हणण्यांत अर्थ नाही.

त्यांनी जें अितिहासाचार्य राजवाड्यांचें उदाहरण दिलें आहे, तें ध्येयवादापुरतें खरें असलें तरी अनुकरणीय नाही, असें मला स्पष्ट म्हणावेंसें वाटतें. राजवाड्यांनी म्हणे त्याग केला. केला असेल, पण त्या त्यागाची झळ कोणाला

लागली ? संशोधनाच्या कार्याकरतां कां होईना पण लोकांना कंटाळा येईप
ते लोकांकडे मुक्काम ठोकीत, हें कदाचित् पुष्कळांना माहीत नसेल. मा
मतें स्वतःचा भार दुसऱ्यावर टाकणें हें ध्येयाकरतां देखील अक्षम्य आहे.
फंडवाल्या काळ्यांनी देखील त्याग केला. त्यांना आज भीक मागावी लागत
बरें त्याग करून राजवाड्यांनी केलें काय, तर अितिहाससंशोधन. हा
फावल्या वेळीं हातीं घेण्यासारखा आहे, त्यावांचून कोणाचेंही कांही अडत ना
तेव्हा सर्वस्व पणाला लावण्यासारखें त्यांत कांहीं नाही. शिवाजी १६२७
जन्मला की १६३० सालीं, हें ठरविण्याकरतां सर्वस्व पणाला क
लावायला पाहिजे ? तें कळल्याचा कोणाला कांही उपयोग आहे ? शास्त्रीय
धनांत जन्म घातला तर त्याने जगाचें कल्याण होण्याचा संभव असतो,
इतिहाससंशोधनांत नसतो. अितिहाससंशोधनाचा नाद राजवाड्यांना
म्हणून त्यांनी त्यांत जन्म घातला. पण त्या नादाचा कोणालाही उपयोग
त्यामुळें त्याला फारशी किंमत देतां येत नाही. अेखाद्याला बुद्धिबळांचा
असतो, आणि कदाचित् या नादांत जन्म घालणारा मनुष्य सर्व जगांत प
येऊन त्यामुळें हिंदुस्थानची कीर्ति होईल. पण म्हणून अशा मनुष्याचा
कितीसा गौरव करील ? बुद्धिबळें खेळणारे लोक जरूर गौरव करतील,
अशा मनुष्याला कितीसें महत्त्व द्यायचें हा प्रश्न आहे. ज्याकरतां सर्वस्व प
लावायचें, तें ध्येय जगाला, नाहीतर देशाला, शहराला, गांवाला,
असेल तरच त्याचें महत्व आहे. नपेक्षा त्याला फाजील महत्त्व देण्यांत अर्थ न

साहित्य आणि राजकारण यांचा माडखोलकरांनी जो निष्कारण
जोडला आहे, त्यांतही मोठासा अर्थ नाही. अत्रे आणि फडके हे रा
कारणांतील नेतृत्वाकरतां भांडत आहेत, ही कल्पनाच हास्यास्पद आहे.
भांडणांनी नेतृत्व मिळत नसतें हें कळण्याअितकी अक्कल मला वाटतें दोघ
नाही आहे.

नंतर पार्नेलचें उदाहरण देऊनही माडखोलकर म्हणतात की,
खाजगी जीवन धुतल्या तांदुळासारखें नाही त्यांना नेतृत्व मिळत नाही;

मिळूं नये. मिळूं नये अशी कदाचित् माडखोलकरांची अिच्छा असेल, परंतु तें मिळत नाही हें मात्र खोटें. माडखोलकर कशाला अनीति म्हणतात तें मला माहीत नाही. पण हिंदुस्थानांत काय किंवा अितर देशांत काय, आजपर्यंत जे नेते होऊन गेले, किंवा आज ज्यांना नेते समजतात, त्यांची खाजगी वागणूक चालू नीतीला धरून होती किंवा आहे असें म्हणतां येणार नाही. चालू नीतीप्रमाणे न वागणाऱ्या नेत्यांचीं नांवें मीं दिलीं तर तें कदाचित् कायद्याने बदनामीच्या सदरांत येअील, पण तीं सर्वांच्या परिचयाचीं आहेत आणि तीं माडखोलकरांनाही माहीत नसतील असें नाही. मला वाटतें अेक बायको असतांना दुसरी करणें यालाही माडखोलकर अनीति म्हणतात, मग ना. गोखल्यांना दोन बायका अेका वेळीं होत्या हें त्यांना माहीत नाही काय ? ते म्हणतात की नीतीचीं कांही अचल तत्वें असतात. तीं कोणतीं तें सांगण्याचें मात्र त्यांनी टाळलें. हल्लीचें राजकारण म्हणजे नुसत्या बोलण्यापलीकडे कांही करणेंच शक्य नसतें. पण ज्या वेळीं राजकारण जिवंत होतें, तेव्हा तरी नेते नीतिमान कोठे होते ? शिवाजीला अनेक बायका असल्या तरी त्या काळच्या नीतिकल्पनांना बाध येत नव्हता असें म्हणतां येअील, पण बाजीरावाची मस्तानी देखील नीतींतच मोडते काय ? जगांत सर्व कांही बदलत असतें, त्याप्रमाणे नीतितत्वेंही बदलत असतात, आणि त्या त्या काळच्या नीतीलाही नेते पुष्कळ वेळां धाब्यावर बसवतात, असें अितिहास सांगतो. उदाहरणें पाहिजे असतील तर प्राचीन रोमच्या प्रभावी बादशहांची नीति पहावी, किंवा नेपोलिअनसारख्याची उघडपणें उच्चारलेली पहावी.

प्रतिपक्षावर भलभलते आरोप करण्याचीही माडखोलकरांना संवय दिसते, कारण खंडन करायला त्याचा मोठा उपयोग असतो. अेरवीं ‘ रसेलनीति ही मानवी स्वातंत्र्याची पराकोटि आहे आणि मार्क्सवाद हा मानवी उन्नतीची परिसीमा आहे असें अट्टाहासाने प्रतिपादणाऱ्या या पुरोगामी मंडळीला हें आतां स्पष्टपणें सांगण्याची जरूर आहे की रसेलची नवनीति आणि मार्क्सचा साम्यवाद यांना मानवी प्रगतीच्या शास्त्रांतला शेवटचा शब्द मानणें आंधळे-

पणाचें होअील. मानवी संस्कृतीच्या विकासाचे प्रयोग आणि प्रयत्न गेलीं हजारों
चालू आहेत व पुढेंहि चालू राहतील. त्या विकासाच्या मार्गावरील मार्क्सवा
अखेरच्या मैलाचा पाषाण आहे असें मानावयाला आणि तेथे मुक्काम ठोकून आ
बुद्धि कुंठित करून घ्यावयाला मी तरी तयार नाही,' हें त्यांनी कशाला सांगि
आणि कोण तयार आहेत अशी माडखोलकरांची कल्पना आहे ? आ
रसेलच्या किंवा मार्क्सच्या बाजूने बोलतात, ते देखील तयार नाहीत. दुस
मूर्खपणा लादला म्हणजे काल्पनिक वादांत जय मिळवणें सोपें ही गोष्ट
पण असली युक्ति योजणाराचीहि किंमत होते हें माडखोलकर विसर
अर्थात् रसेलला किंवा मार्क्सला देव मानणारे कांही मूर्ख असतील, पण असे
कोणत्या पक्षांत नसतात ? जर प्रतिपक्षाला उत्तर द्यायचें असेल तर तें त्यां
समंजस लोकांना दिलें पाहिजे, मूर्खांना नव्हे. तरच त्या उत्तराला कांही कि
आहे. तें उत्तर माडखोलकरांना देतां येत नाही, तेव्हा ते आव असा आ
की जणूं काय आपण रसेलच्या किंवा मार्क्सच्याही पुढें दोन पावलें गेलों आ
आणि अितर लोक मात्र मागें रेंगाळत आहेत ! हें ढोंग चालेल कसें ? मा
खोलकरांच्या कल्पना बऱ्याच सनातनी आहेत हें काय आम्हाला माहीत ना
तेव्हा हें तत्त्वज्ञान माडखोलकर कोणाला शिकवतात ?

नागपूरच्या **महाराष्ट्रांत** अेकाने दिवेकरशास्त्र्यांना उत्तर देतांना '
तेंही वैदिकच आहेत ' असें ठांसून सांगितलें आहे, आणि त्याला पुरावा म्ह
कांहीं वेदवाक्यें दिलीं आहेत. हा निरर्थक वाद पाहिजे कशाला ? वेदवाक्य
आतां कोणीहि प्रमाण मानीत नाही, निदान समंजस माणसें मानीत ना
वेदकालीन लोकांचा ज्योतिषावर विश्वास असला तर तें क्षम्य आहे,
हल्लीच्या दिवसांत ज्योतिषावर विश्वास ठेवणें हें मागसलेपणाचें लक्षण
आजपर्यंत ज्योतिषाचे साह्यानें मुहूर्त पाहूनच सर्व लग्नें होत आलीं, आ
अजून देखील बहुतेक लग्नें तशींच होतात. मग हिंदुस्थानांत बाल
वांची जी प्रचंड संख्या आहे ती कशी ? मुहूर्त पाहूनही जर वैधव्य टळत ना
तर तो पहायचा कशाकरितां ? सनातनी हिंदु समाजांत यापेक्षा अ

कोणती आपत्ति वधूवर ओढवणें शक्य असतें ? अेवढी अेकच गोष्ट ज्योतिषाचा फोलपणा सिद्ध करण्यास पुरेशी आहे. ज्योतिष हें निव्वळ थोतांड आहे, उपजीविकेचा अेक अप्रामाणिक मार्ग आहे, यापेक्षा हल्ली ज्योतिषाचें महत्त्व काय आहे ? खगोलविद्या हें शास्त्र आहे, फलज्योतिष हें शास्त्र नाही, फसवणूक आहे. मुहूर्त पहावा असें वेदांत सांगितलें असलें तर तो वेदांचा मूर्खपणा आहे. तेव्हां अमुक गोष्ट वैदिक आहे म्हणून चांगली ठरवणें समंजस नव्हे, आणि हल्ली कायदेशीर वैदिक विवाहाला देखील मुहूर्ताची जरूर लागत नाही.

तुझी **शारदा**

---

# संततिनियमनार्थ नवीन प्रकारची टोपी

चालू युद्धाच्या परिस्थितींत संततिनियमनार्थ सामान्यतः वापरण्यांत येणारी ' डच कॅप ' अिंग्लंदांत बनवणें मुष्किल झाल्यामुळें व अितर देशांतून माल येणें जवळ जवळ अशक्य झाल्यामुळे आम्ही अिंग्लंडांतून अेक नवीन प्रकारची टोपी मागवली आहे. तिचें नांव ' द्युमास कॅप '. हिचा आकार जवळ जवळ डच कॅप सारखाच आहे; परंतु तींत स्प्रिंग नाहीं, आणि तिची कडा बरीच जाड आहे. अर्थात् स्प्रिंग नसल्यामुळे ही डच कॅपसारखी बसणार नाही. ती गर्भाशयाचे तोंडावर उपडें झांकण घातल्यासारखी बसवावी लागेल व तिची जाड कडा गर्भाशयाचे भोंवतालच्या जागेंत बसेल. या टोपीचे लहान, मध्यम व मोठा असे तीनच आकार आहेत, आणि किंमत डच कॅपाअितकीच आहे.

उभट आकाराची टोपीही अशाच रीतीनें बसते असें कोणास प्रथमदर्शनीं वाटेल, परंतु या दोहोंतला फरक विचारांतीं लक्षांत येअील. उभट टोपीची कडा गर्भाशयाचे टोंकावर दाबून बसते, आणि या दाबामुळें पुष्कळ वेळां त्रास होतो व दाब पुरेसा नसल्यास ती निसटून येते. परंतु द्युमास टोपीची कडा अत्यंत मऊ रबराची असते, आणि ती जाग्यावर बसते ती दाबामुळे नव्हे,

तर तिची जाड कडा गर्भाशयाच्या मुखाभोंवतालच्या जागेंत अडकून बसल्यामुळे यामुळे या टोपीने कोणालाही त्रास होण्याचा संभव नाही. सर्व प्रकारच्या टोप्यांत डच कॅप श्रेष्ठ आहे हें खरें, परंतु ती मिळत नाही तोंपर्यंत पुष्कळांना चुमास कॅप वापरणें भाग पडण्याचा संभव आहे.

---

**धार्मिक श्रद्धा.** धार्मिक लोकांची कशावर श्रद्धा बसेल हें सांगणें कठिण आहे. नुकतीच अमेरिकेंत अेक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे ती अशी की अेका मनुष्याचा अेक पाय कांही कारणानें आंखूड झाला होता, याकरतां तो अेका धार्मिक वैदूकडे गेला असतां त्याने बरेच पैसे घेऊन असें सांगितलें की ' मी सात महिनेपर्यंत अेकांतांत प्रार्थना करतों, म्हणजे पाय पूर्ववत् लांब होओील.' चमत्कार असा झाला की यानंतर पाय वाढीस लागला आणि तो तीन महिन्यांतच पूर्ववत् झाला. तेव्हां प्रार्थना बंद करण्यास सांगावें म्हणून पाहतात तों वैदूचा पत्ता नाही. तथापि त्याने प्रार्थना तशीच चालू ठेवली असली पाहिजे, कारण आणखी तीन महिन्यांनी पाहतात तों त्या पायाची वाढ तशीच चालू राहून आतां तो पाय दुसऱ्यापेक्षां अधिक लांब झाला होता.

\+ + +

अमेरिकेंतील प्रसिद्ध विनोदी लेखक मार्क ट्वेन हा अेकदां अेका पत्राचा संपादक होता. अेका वाचकाला अेकदां अेका अंकांत कोळी चिकटलेला आढळला, तेव्हा त्यानें मार्क ट्वेनला विचारलें कीं हें सुचिन्ह समजावें की दुश्चिन्ह? यावर मार्क ट्वेनने उत्तर दिलें, तें सुचिन्ह नाही आणि दुश्चिन्हही नाहीं. ' कोळी असें पहात होता की या पत्रांत जाहिरात न देणारे कोणते व्यापारी आहेत म्हणजे त्यांपैकीं अेखाद्याच्या दारावर आपण आपलें जाळें पसरावें, म्हणजे आपल्याला कोणी त्रास देणार नाही. निश्चिंत बसायला सांपडेल. '

× × ×

मनुष्याच्या चेहऱ्यावरून तो देखणा आहे की नाही हें समजेल. पण अितर कोणताही गुण समजत नाही.

---